# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## - <u>घोषणा</u> -

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **दि. 13 मे,** 2018 रोजी घेण्यात आलेल्या **महाराष्ट्र दुय्यम सेवा, गट - ब (अराजपत्रित) (पूर्व) परीक्षा** - 2018 या स्पर्धा परीक्षेच्या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या प्रश्नपत्रिकांच्या चारही संचाच्या उत्तरतालिका उमेदवारांच्या माहितीसाठी **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

सदर परीक्षांमधील आकृत्यांवर / नकाशांवर आधारित प्रश्नांच्या मुल्यांकनात दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांना आकृत्या/नकाशांवर आधारित असलेल्या प्रश्नांमध्ये खालील विवरणपत्रात नमूद प्रश्नांना सवलत देण्याचे प्रस्तावित आहे, याची दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| **संच A** | **संच B** | **संच C** | **संच D** |
|---|---|---|---|
| 86 | 90 | 89 | 90 |
| 93 | 86 | 98 | 97 |
| 95 | 100 | 97 | 96 |

**तसेच प्रस्तुत परीक्षेसाठी उमेदवारांना उत्तरतालिकेतील प्रश्न - उत्तरासंबंधी अभिवेदने करावयाची असल्यास, ती आयोगाने प्रसिध्द केलेल्या हरकतीच्या नमुन्यातच करावयाची आहेत. आयोगाच्या** www.mpsc.gov.in **या संकेतस्थळावर "हरकतीचा नमुना" उपलब्ध आहे. आयोगाने विहित केलेल्या हरकतीच्या नमुन्या व्यतिरीक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील हरकती स्वीकारल्या जाणार नाहीत.** उमेदवारांनी त्यांच्या हरकती विहित नमुन्यात ' परीक्षा नियंत्रक व सह सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, $5^{1/2}$, 7 व 8 वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई 400021' या पत्त्यावर पाठवावीत. या संदर्भात **दि. 23 मे,** 2018 पर्यंत आयोगाकडे पोहोचलेल्या निवेदनांचीच फक्त दखल घेतली जाईल. तद्नंतर आलेली निवेदने विचारात घेतली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : 16 मे, 2018
ठिकाण : मुंबई

परीक्षा नियंत्रक व सहसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
मुंबई